# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२, ई शिवाजीनगर पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ **E-Mail – ropune@dtemaharashtra.gov.in**


जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०१९/ ५९४० दिनांक :- 09 DEC 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य
सर्व शासकीय अभियांत्रिकी व शासकीय औषधनिर्माणशास्त्र (पदवी अभ्यासक्रम संस्था)
पुणे विभाग.

**विषय – आढावा बैठक – दिनांक १३/१२/२०१९ वेळ सकाळी ११.०० वाजता**

संदर्भ – .मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१६/प्राचार्य आढावा बैठक/२०१९/३४४ दिनांक ०७/१२/२०१९

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रान्वये सुचित केल्याप्रमाणे, संस्थेतील विविध विषयांबाबतची सद्यस्थिती व कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी दिनांक १३/१२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता संचालनालय येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी संदर्भिय पत्रातील सुचनेनुसार व बैठकीच्या विषयसुचीच्या अनुषंगाने आपल्या संस्थेची स्वयंस्पष्ट माहिती व Power Point Presentation सह पुर्वनियोजित वेळेस संचालनालयांत उपस्थित रहावे.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२

E-mail :- desk1@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in


बैठकीची सूचना

क्र. १६/प्राचार्य आढावा बैठक/२०१९/३४४

दिनांक : ०७१२१२०१९

प्रति,

प्राचार्य

शासकीय अभियांत्रिकी व

शासकीय औषधनिर्माणशास्त्र

पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : आढावा बैठक - दिनांक १३ डिसेंबर,२०१९ वेळ : स.११.०० वा.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणा-या शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्राचार्यांची संस्थेतील विविध विषयांबाबतची सद्यस्थिती व कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी दि. १३ डिसेंबर, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता आढावा बैठक संचालनालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीस मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन हे उपस्थित राहणार आहेत. बैठकीची विषयसूची सोबत जोडण्यात येत आहे.

सदर विषय सूचीमध्ये नमूद केलेल्या मुद्दयांबाबतच्या स्वयंस्पष्ट माहितीसह व Power Point Presentation सह संस्थाप्रमुखांनी व्यक्तीशः बैठकीला उपस्थित रहावे. बैठकीसाठी प्रतिनिधी पाठविण्यात येऊ नये तसेच बैठकीसाठी कोणीही अन्य अधिकारी/कर्मचारी यांना सोबत आणण्यात येऊ नये.


तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
आवक क्र. ...92364...


(डॉ. अभय वाघ)

संचालक

तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन यांना माहितीकरीता सविनय सादर.

२. मा. श्री. सतीश तिडके, उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीकरता सादर.

D:\Menutes of Meeting\आढावा बैठक पत्र Deg.Prin..docx

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४००००१

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२

E-mail :- desk1@dtemaharashtra.gov.in internet :- http://www.dtemaharashtra.gov.in


संचालनालया अंतर्गत असलेल्या शासकीय पदवी अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या प्राचार्यांच्या आढावा बैठकीकरीता प्रस्तावित मुद्दे -

भाग - १ : शैक्षणिक बाबी

१. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये संबंधीत संस्थांच्या अभ्यासक्रमनिहाय प्रथम वर्ष पदवी, पदव्युत्तर पदवी व Ph.d. यामधील प्रवेशाबाबतची सांख्यिकी माहिती, तसेच संस्थेमध्ये इतर वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय सांख्यिकी माहिती.

२. संस्थेच्या अभ्यासक्रमाच्या NBA बाबतची माहिती व NBA नसल्यास त्याबाबतचे संस्था स्तरावरील नियोजन. तसेच संस्थेच्या Autonomy बाबतची सद्यस्थिती.

३. संस्थेमध्ये Teaching Learning Process बाबत करण्यात येत असलेल्या नाविन्यपूर्ण बाबी.

४. संस्थेमध्ये SWAYAM मार्फत Mooc's व इतर Online अभ्यासक्रमात नोंदणी केलेल्या शिक्षक व विद्यार्थ्यांची संख्या तसेच याबाबतचे संस्था स्तरावरील नियोजन.

५. संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबत संस्था स्तरावर करण्यात येत असलेली कार्यवाही.

६. संस्थेमध्ये विद्यार्थ्यांच्या Placement बाबतची Branch निहाय माहिती.

७. संस्थेमध्ये संशोधन वाढीसाठी करण्यात येत असलेले प्रयत्न, Research Paper, Patent इ. बाबतची आणि इतर प्रोत्साहनपर योजनेबाबतची माहिती.

८. संस्था स्तरावर उद्योगधंद्यासोबत केलेल्या MOU बाबतची Outcome व Beneficiary इ.बाबतचा उल्लेख असलेली माहिती.

९. संस्थेमध्ये सुरु असलेल्या TEQIP व इतर केंद्र पुरस्कृत योजनांबाबतची योजनानिहाय संक्षिप्त माहिती.

१०. संस्थेमध्ये IRG बाबत करण्यात येत असलेले प्रयत्न.

११. संस्थेमध्ये सुरु असलेल्या Centre of Excellence व त्याबाबतची सविस्तर माहिती.

१२. संस्था स्तरावर विद्यार्थी व समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबतची माहिती.

भाग - २ : प्रशासकीय बाबी

१. स्वायत्त संस्थांमधील BOG बैठकीबाबत शासनाच्या दि. ८/११/२०१९ च्या पत्रातील सूचनांच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.

२. संस्थेमध्ये वर्ग-१ ते वर्ग-४ संवर्गातील मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांचा पदनिहाय तपशिल.

३. संस्थेशी संबंधीत प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे/अवमान याचिका याबाबतची वर्षनिहाय व न्यायालयनिहाय सद्यस्थिती.

४. संस्थेच्या परिसरातील स्वच्छता, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये असणारी शिस्त, विद्यार्थ्यांची सुरक्षितता, संस्था परिसराचे सुशोभिकरण याबाबत संस्थांकडून करण्यात येत असलेल्या प्रयत्नांचा तपशिल.

भाग - ३ : आर्थिक बाबी

१. संस्थेमध्ये UG, PG व Ph.D. अभ्यासक्रमाकरीता आकारण्यात येत असलेल्या शुल्काचा तपशिल.

२. संस्थेकरीता मागील ३ वर्षात शासनाकडून व इतर Project अंतर्गत मंजूर निधी व त्यानुसार झालेला खर्च तसेच BOG च्या मान्यतेने मागील ३ वर्षात करण्यात आलेल्या खर्चाची सविस्तर माहिती.

३. TEQIP अंतर्गत मागील ३ वर्षात खरेदी करण्यात आलेल्या प्रकरणांची वर्षनिहाय माहिती, व सदर प्रकरणांच्या उपयोगितेबाबतचा तपशिल.

४. शासनाच्या GEM प्रणालीमार्फत खरेदी प्रक्रीया होते किंवा कसे याबाबतची माहिती.

५. संस्थेला सन २०१९-२० मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने संस्थेत सुरु असलेल्या बांधकामाबाबतची सद्यस्थिती तसेच पुढील वर्षात आवश्यक निधी व यंत्रसामुग्री खरेदीबाबतची सद्यस्थिती.

६. संस्थेतील PLA व इतर लेख्यामध्ये उपलब्ध असलेल्या निधीचा तपशिल.

**********************